**नि.फौ.ख.क्र.१९२/२०२४**

**सरकार वि. सचिन भोयर**

MHWS070014912024

दाखल दिनांक : ३०/०७/२०२४
नोंदणी दिनांक : ३०/०७/२०२४
न्यायनिर्णय दिनांक : ०१/०४/२०२६
कालावधी : ०१वर्ष०८ म.०२ दि.

**कारंजा येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी : पी. डी. देवरे)

**न्यायनिर्णय**

(दिनांक ०१ एप्रिल २०२६ ला घोषित)

**नि.फौ ख.क्र. १९२/२०२४** **निशाणी क्र.२८**

**भाग – अ**

| | |
|---|---|
| | प्रथम खबर अहवाल / गुन्हा व पोलीस ठाणे तपशील |
| **अभियोगपक्ष** | महाराष्ट्र शासन द्वारा<br>कारंजा शहर पोलीस ठाणे,<br>ता. कारंजा (लाड), जि. वाशिम.<br>गु.र.न.३९९/२०२४ |
| **अभियोगपक्षाचे मा. विधीज्ञ** | सहा. सरकारी अभियोक्ता – श्री. एन. डब्ल्यु. सबरदंडे. |
| **आरोपी** | **सचिन वासुदेवराव भोयर**<br>वय :३४ वर्ष, व्यवसाय: दुकाण |

नि.फौ.ख.क्र.१९२/२०२४
सरकार वि. सचिन भोयर

| | |
|---|---|
| | रा. आदर्श नगर कारंजा, ता. कारंजा, जि. वाशिम |
| आरोपीचे मा. विधीज्ञ | श्री. जे. एम. खान |

भाग 'ब'

| | |
|---|---|
| गुन्हयाचा दिनांक | ०६/०६/२०२४ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०६/०६/२०२४ |
| दोषारोप पत्र दिनांक | ३०/०७/२०२४ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | २०/०२/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २५/०३/२०२५ |
| न्यायनिर्णयास राखीव ठेवल्याचा दिनांक | लागू नाही |
| न्यायनिर्णय घोषीत केल्याचा दिनांक | ०१/०४/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक, असल्यास | लागू नाही |

आरोपीची माहिती

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सुटल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोषमुक्त / शिक्षा | दिलेली शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ नुसार खटल्याकामी आरोपीचा असलेला |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | न्यायाधीन बंदी कालावधी |
| १. | **सचिन वासुदेवराव भोयर** | कलम ४१(१) प्रमाणे नोटिस व समजपत्र | निरंक | कलम ३२४, ५०४ व ५०६ भा.द.सं. | निर्दोष | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

(दिनांक ०१ एप्रिल २०२६ ला घोषित)

१. आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ५०४ व ५०६ अन्वये खटला चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाचे वाद प्रकरण थोडक्यात खालीलप्रमाणे –**

२. फिर्यादी रमेश गोपालराव मोडक हे कृषी नगर, कारंजा, ता. कारंजा येथे राहतात. ते जि. प. शाळा, पिंप्री मोडक, ता. कारंजा येथे व त्यांची पत्नी दिपाली ही जि. प. शाळा, मानोरा येथे शिक्षक म्हणून नोकरीस आहे. आरोपी सचिन हा दिपालीचा भाऊ आहे. फिर्यादीची आई सुशिला ही वयस्कर असून ती फिर्यादीसोबत राहते व त्यांच्या मुलांना सांभाळते व घरातील सर्व कामे करते. फिर्यादीची आई वयस्कर असल्याने घरातील कामे करण्यावरुन फिर्यादीचे त्यांची पत्नी दिपाली हिचेसोबत नेहमी वाद होतात. दिनांक ०६/०६/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजताच्या दरम्यान फिर्यादी व त्यांची पत्नी घरी होते. फिर्यादी त्यांच्या मुलांसोबत खेळत होते. त्यांची पत्नी दिपाली मोबाईल पाहत होती. फिर्यादी यांनी त्यांच्या पत्नीला 'मुलांना सांभाळ' असे म्हटले असता तिने त्यांना 'तुमचे लेकरं आहेत, तुम्हीच सांभाळा' असे उत्तर दिले. तिने फोन करुन तिच्या वडिलांना बोलावून घेतले.

तिचे वडिल आल्यानंतर तिने तिच्या वडिलांना फिर्यादी व त्यांची आई तिला मारहाण करतात असे सांगितले. फिर्यादीच्या पत्नीचे वडिल फिर्यादीच्या पत्नीला त्यांच्या घरी घेवून गेले. थोडयावेळाने आरोपी फिर्यादीच्या घरी आला. त्याने फिर्यादीला कपाळावर व उजव्या डोळयाच्या वर मारले. त्यामुळे त्यांना कपाळावर बेंड आले व डोक्याजवळ जखम झाली. त्यांची आई सुशिला भांडण सोडवण्यासाठी आली असता तिलादेखील आरोपीने तोंडावर फायटरने मारले. त्यामुळे त्यांच्या आईच्या तोंडाला जखम होवून रक्त निघाले. नंतर आरोपीचे आई–वडिल त्यांच्या घरी आले व ते आरोपीला घेवून गेले. त्यामुळे फिर्यादीने कारंजा शहर पोलीस स्टेशन येथे आरोपीविरुध्द फिर्याद दिली.

३. सदर फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द कारंजा शहर पोलीस स्टेशन, ता. कारंजा येथे गु.र.क्र. ३९९/२०२४ भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ५०४ व ५०६ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्हयाचा तपास गणेश वा. नागरीकार, पो.ना. यांनी केला. तपासाअंती पुरावा मिळून आल्याने तपासी अधिकारी यांनी वरील कलमान्वये आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करुन आरोपीविरुध्द निशाणी १० वर भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ५०४ व ५०६ कलमान्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयांकरिता दोषारोप निश्चित केला. आरोपीने त्याचे निवेदन निशाणी ११ नुसार त्याला गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व वाद प्रकरणाची गुणदोषांवर संपरीक्षा व्हावी अशी मागणी केली.

५. सदर खटल्यात मुळ फिर्यादी व साक्षीदार यांनी निशाणी १६ ला अर्ज देवून त्यांचेत व आरोपीमध्ये तडजोड झाली असल्याचे सांगितले व तडजोड करण्याकामी परवानगी मागितली. परंतु सदर खटल्यातील भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ हे तडजोडपात्र नसल्याने परवानगी नाकारण्यात आली व खटला पुढे चालविण्यात आला.

६. आरोपीवरील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने न्यायनिर्णयाचे भाग क

मधील साक्षीदारांची साक्ष नोंदविली. आरोपीतर्फे घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा व फिर्यादीचे व साक्षीदाराचे वैद्यकीय प्रमाणपत्र मान्य करण्यात आले. त्यामुळे निशाणी ०१ वरील आदेशाने अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

७. अभियोगपक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होईल अशी कोणतीही परिस्थिती अभिलेखावर आली नाही. त्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये आरोपीचे निवेदन नोंदविले नाही.

८. अभियोगपक्षाचा साक्षीपुरावा व बचाव पक्षाच्या वतीने करण्यात आलेले युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझे निर्णयाकरीता येतात. त्यावरील निष्कर्ष कारणांसह मी खालील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, आरोपीने दिनांक ०६/०६/२०२४ रोजी १५.०० वाजताचे सुमारास कृषी नगर, कारंजा, ता. कारंजा, जि. वाशिम येथे फिर्यादी रमेश गोपालराव मोडक यांच्या कपाळावर, उजवे डोळयाच्या वर, पाठीवर व फिर्यादीची आई सुशिला हिच्या तोंडावर फायटर या मृत्यू होण्याचा संभव असणा–या हत्याराने इच्छापूर्वक दुखापत पोहचविली म्हणून भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ अन्वये गुन्हा केला? | **नाही.** |
| **२.** | अभियोगपक्ष शाबीत करतो काय की, वरील नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीकडून व साक्षीदाराकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा या उद्देशाने फिर्यादी व साक्षीदाराला शिवीगाळ केली व अपमान करुन त्यांना प्रक्षोभित केले व भारतीय दंड संहितेचे कलम ५०४ प्रमाणे गुन्हा केला? | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ३. | अभियोगपक्ष शाबीत करतो काय की, वरील नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादी व साक्षीदारास फौजदारी पात्र धाकदपटशा करत दहशत निर्माण केली, जिवे मारण्याची धमकी दिली व भारतीय दंड संहितेचे कलम ५०६ प्रमाणे गुन्हा केला? | **नाही.** |
| ४. | आदेश काय? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

## !! का र ण मी मां सा !!

**मुद्दे क्र. १ ते ४ बाबतः–**

९. साक्षीदार क्र.०१ रमेश, फिर्यादी व सा.क्र. ०२ सुशिला, जखमी व फिर्यादीची आई यांचे पुराव्यामध्ये असे आले आहे की, दिनांक ०६/०६/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजताच्या सुमारास कृषी नगर, कारंजा येथे त्यांचे व आरोपीचे किरकोळ कारणावरून किरकोळ वाद झाले होते. त्या व्यतिरिक्त काहीही घडले नव्हते. बोलाचालीदरम्यान ते खाली पडल्यामुळे सा. क्र. ०१ ला डोक्याला व सा. क्र. ०२ यांच्या तोंडाला दुखापत झाली होती. घटनेच्या दिवशी आरोपीने त्यांना मारहाण, शिवीगाळ केली नव्हती व जिवे मारण्याची धमकी दिली नव्हती.

१०. फिर्यादी हे त्यांच्या जबानी रिपोर्ट/फिर्याद प्रमाणे व सा. क्र.०२ हे त्यांच्या पुर्वीच्या पोलीस जबाबाप्रमाणे साक्ष देत नसल्याने अभियोगपक्षाने सदर साक्षीदारांची शोधक उलटतपासणी घेतली; परंतु त्यामध्ये सुध्दा या साथीदारांनी अभियोगपक्षास कोणतेही सहकार्य केले नाही. त्यामुळे या साक्षीदारांच्या साक्षीचा अभियोगपक्षाला कोणताही उपयोग होत नाही. याउलट अभियोगपक्षातर्फे त्यांना विचारण्यात आलेल्या सूचक प्रश्नांच्या उत्तरादाखल त्यांनी मान्य केले की, त्यांच्यामधील व आरोपीमधील वाद मिटलेला आहे. त्याबाबतची तडजोड पुरसीस त्यांनी निशाणी १७ वर दाखल केलेली आहे.

११. वरील साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन करता असे दिसते की, सा. क्र. ०१ फिर्यादी व सा.क्र.०२, जखमी या दोन्ही महत्त्वाच्या साक्षीदारांनी फिर्यादीतील घटनेच्या दिनांकाबाबतचा मजकूर वगळता इतर संपूर्ण घटनाच नाकारलेली आहे. फिर्यादीला आरोपीविरुध्द त्यांनी दिलेली फिर्याद (जबानी रिपोर्ट) दाखविण्यात आली. सदर फिर्यादवर त्यांची सही असल्याचे त्यांनी ओळखले. परंतु त्यातील मजकुराबाबत त्यांना काहीही माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले. यावरून असे दिसते की फिर्यादीने दिलेली फिर्याद व न्यायालयापुढे दिलेली साक्ष यामध्ये विसंगती आढळून येते. सा.क्र.०२ यांची साक्ष देखील त्यांच्या पुर्वीच्या पोलीस जबाबाशी विसंगत आहे.

१२. अभियोगपक्षाने केसकामी तपासलेले महत्त्वाचे साक्षीदार फिर्यादी व सा.क्र.०२ यांनीच घटना नाकारलेली आहे. फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये तडजोड झाल्यामुळे व आरोपीने साक्षीदाराचे घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा व साक्षीदारांचे वैद्यकीय प्रमाणपत्र मान्य केल्यामुळे अभियोगपक्षातर्फे इतर साक्षीदार तपासण्यात आले नाहीत. वरील परिस्थितीत घटनेच्या दिवशी फिर्यादी, साक्षीदार व आरोपी यांच्यामध्ये नेमकी काय घटना घडली याबाबत कोणताही स्पष्ट पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही.

१३. या प्रकरणात उद्देश व तयारी या दोन्ही तत्त्वांचा अभाव आहे. अभियोगपक्षाने आरोपीवर भारतीय दंड संहितेच्या ज्या कलमांनुसार दोषारोपपत्र दाखल केलेले आहे, त्याप्रमाणे अनुषांगिक घटक हे फिर्यादी व साक्षीदार यांनीच घटना नाकारल्यामुळे अभियोगपक्षाला सिध्द करता आलेले नाही. त्यामुळे आरोपीने फिर्यादी रमेश यांच्या कपाळावर, उजवे डोळयाच्या वर, पाठीवर व फिर्यादीची आई सुशिला हिच्या तोंडावर फायटर मारुन इच्छापूर्वक दुखापत केली व फिर्यादीला शिवीगाळ करुन त्यांना व सा. क्र. ०२ यांना जिवे मारण्याची धमकी दिली हे सिध्द होत नाही. जोपर्यंत आरोपीवरील आरोप संशयापलीकडे सिध्द होत नाहीत तो पर्यंत कायदा आरोपीस निरपराध समजतो. आरोपीचा तो संविधानात्मक हक्क आहे. त्यामुळे वरील परिस्थितीत आरोपीला निर्दोष मुक्त करणे क्रमप्राप्त आहे.

१४.		सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल एक पिवळसर धातुचे फायटर हे मुल्यहीन व गैरउपयोगी असल्यामुळे अपील कालावधीनंतर त्यांचा नियमाप्रमाणे नाश कण्याबाबत आदेश करणे योग्य होईल.

१५.		आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ अ (१) चे पूर्ततेकामी जामीन दिलेला आहे. सबब, मुद्दे क्र. १ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी देवून मुद्दा क्र. ४ करिता खालील आदेश पारित करित आहे.

## आ दे श

१. फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८ (१) अन्वये आरोपी सचिन वासुदेवराव भोयर यांची भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ५०४ व ५०६ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे पूर्वीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल एक पिवळसर धातुचे फायटर हे मुल्यहीन व गैरउपयोगी असल्यामुळे अपील कालावधीनंतर त्याचा नियमाप्रमाणे नाश करण्यात यावा.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ चे पुर्ततेकामी दाखल केलेले जामीन बंधपत्र खटल्याच्या न्यायनिर्णयापासून पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अस्तित्वात राहिल.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PANDIT DAGU DEORE
Date: 2026.04.02 16:25:30 +0530

**(पी. डी. देवरे)**

दिनांक: ०१/०४/२०२६.

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

कारंजा (लाड).

नि.फौ.ख.क्र.१९२/२०२४

सरकार वि. सचिन भोयर

भाग 'क'

अ. अभियोगपक्षाचे साक्षीदार

| साक्षीदार | साक्षीदाराचे नांव | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१ | रमेश गोपालराव मोडक | १८ | फिर्यादी व जखमी |
| ०२ | सुशिला गोपालराव मोडक | २१ | फिर्यादीची आई व जखमी |

ब. बचाव पक्षाचे साक्षीदार

| साक्षीदार | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

क. न्यायालयाचे साक्षीदार

| साक्षीदार | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

अ. अभियोगपक्षाचे निशाणी यादी

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | २२ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | २३ | एक पिवळसर धातुचे फायटरचा जप्ती पंचनामा |
| ३. | २४ व २५ | साक्षीदार क्र. ०१ व ०२ यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र |

ब. बचाव पक्षाची निशाणी यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

नि.फौ.ख.क्र.१९२/२०२४

सरकार वि. सचिन भोयर

## क. न्यायालयाचे निशाणी यादी

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ०१ | दोषारोपपत्र |
| २. | ०२ | आरोपीचे वकीलपत्र |
| ३. | ०९ | फिर्यादीचे वकीलपत्र |
| ४. | १० | दोषारोप |
| ५. | ११ | आरोपींचे गुन्हयाचे निवेदन |
| ६. | १६ | फौ.प्र.सं. कलम ३२०(२) नुसार तडजोड करणेकामी परवानगीचा अर्ज |
| ७. | १७ | मुळ फिर्यादी, साक्षीदार व आरोपी यांच्यात प्रकरण आपसात मिटल्याबाबत संयुक्त पुरसिस |

## ड. वस्तु/ मुद्देमाल यादी

| अनु.क्र. | वस्तु/ मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | पोलीस ठाणे मुद्देमाल क्रमांक ५२/२०२४ | चार छिद्र असलेले औकदार व पकड असलेले पिवळसर धातुचे फायटर |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PANDIT DAGU DEORE
Date: 2026.04.02 16:25:40 +0530

(**पी. डी. देवरे**)

दिनांक: ०१/०४/२०२६.

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

कारंजा (लाड).

नि.फौ.ख.क्र.१९२/२०२४

सरकार वि. सचिन भोयर

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | K. A. Paraswai ( Stenographer Grade-III) |
| Court Name | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Karanja. Dist. Washim. |
| Date | :- | 01/04/2026 |
| Order signed by the presiding officer on | :- | 01/04/2026 |
| Order uploaded on | :- | 02/04/2026 |